प्रकरण - 2

प्रकाशन : 1

**संस्थेची वैशिष्टये, कार्य आणि कर्तव्ये :**

सन 1888 चा मुंबई अधिनियम क्र. 3 असलेल्या मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 63 (ड) अन्वये, सार्वजनिक उपवने, उद्याने अथवा मनोरंजन मैदाने (जलतरण तलाव) उभारणे अथवा ती सुस्थितीत ठेवणे हे बृहनमुंबई महानगरपालिकेचे स्वेच्छाधिन कर्तव्य आहे. बृहमुंबई महानगरपालिकेच्या तरण तलावात सर्वसाधारण जनतेस पोहण्यास शिकवण्यासाठी, पोहण्यासाठी संधी उपलब्ध करुन मनोरंजन सुविधा देणे हे मुंबई महानगरपालिकेचे कार्य आहे.

**महात्मा गांधी तरण तलाव, शिवाजी पार्क :**

महात्मा गांधी महानगरपालिका जलतरण तलाव दादर येथे समुद्रकिना-यावर महापौर निवासाजवळ असून तो सन 1952 मध्ये बांधण्यात आला. हा तलाव सन 1955 मध्ये महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आला. हा जलतरण तलाव ऑलिम्पिक प्रमाणकाप्रमाणे आहे.

आकृतीबंध रचना

महानगरपालिका आयुक्त

↓

अति. मनपा. आयुक्त (पूर्व उपनगरे)

↓

उप-आयुक्त (उद्याने व सुरक्षा)

↓

व्यवस्थापक

↓

सहाय्यक व्यवस्थापक

↓

लिपिक

तांत्रिकी कर्मचारी व श्रमिक कर्मचारी

तरण तलावाद्वारे पुरविण्यात येणा-या सेवा आणि जनतेच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी, महात्मा गांधी स्मारक ऑलिंपिक जलतरण तलाव, शिवाजी पार्क येथील कार्यालयात तक्रार वही ठेवण्यात आलेली आहे. सदस्य व जनता यांजकडून वेळोवेळी येणा-या तक्रारींची दखल घेण्यात येते आणि देण्यात येणा-या सुविधांत सुधारणा व जनतेच्या आलेल्या तक्रारीची तीव्रता (गांभीर्य) लक्षात घेऊन त्यांचे निवारण करण्यात येते. तक्रारीचे स्वरुप लक्षात घेऊन त्या संबंधित अधिका-यांकडे योग्य त्या कार्यवाही आणि निर्णयार्थ पाठविण्यात येतात.

पुनर्विकासानंतर महात्मा गांधी जलतरण तलाव दि.11.10.2011 पासून सभासदांसाठी खुला करण्यात आला आहे.